**नियमित दिवाणी दावा क्र. ४८/२०२२**

## निशाणी क्र. ५ खाली आदेश

(घोषित दिनांकः १८.०४.२०२३)

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ३९ नियम १ व २ नुसार तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्याकरिता दाखल केला आहे.

२. वादीचे थोडक्यात कथन आहे की, वादी हे मौजे कंज्यापानी, ता. अक्राणी येथील रहिवासी असून शेती व्यवसाय करतात. तसेच प्रतिवादी क्र. १ व २ हे मौजे साबलापानी, बुरिंगमालपाडा, ता. शहादा येथील रहीवासी आहेत. तसेच प्रतिवादी क्र. ३ ते ६ हे मौजे कंज्यापानी, ता. अक्राणी येथे वास्तव्यास आहेत. वादी हे आदिवासी समाजातील पावरा जातीचे आहेत. प्रतिवादींशी वादींचे कोणत्याही प्रकारचे रक्ताचे नातेसंबंध नाहीत.

३. मौजे कंज्यापानी ग्रामपंचायत घाटली, ता. अक्राणी या गावाच्या शिवारातील खासरा/खंड ३२१, क्षेत्र ०३–२५ आर ही वन अतिक्रमित जमीन वादी हे खेडीत आहेत. तिच्या चतुर्सिमा खालीलप्रमाणे–

पुर्व– काशा हुन्या ठाकरेचे शेत,
पश्चिम– शिलदार फाडया पावरा यांचे शेत,
दक्षिण – बाहदऱ्या काल्या पावरा यांचे शेत,
उत्तर – मोठा नाला व घाट.

सदरील जमीन ही दाव्याचा विषय असुन या मिळकतीला सोयीच्या दृष्टीने यापुढे ''दावा मिळकत'' असे संबोधले जाईल.

४. वादी हे दावा मिळकतीचे मालक व कब्जेदार आहेत. दावा मिळकत ही ४० ते ४५ वर्षांपूर्वी वादीचे वडील व वादी क्र. १ व २ यांनी झाडे लावून शेतीयोग्य केलेली होती. तेव्हापासून आजपर्यंत दावा मिळकत ही वादींच्या कब्जात असून खेडपेर करीत आहेत. दावा मिळकतीत वादींचे कौलारु कुडाचे घर असून तेथे ४० x २५ फुट लांबी रुंदीचा पाया बांधलेला आहे. तसेच दावा मिळकतीत वेगवेगळ्या प्रकारचे झाडे असून त्यांचा उपभोग वादी घेत आहेत.

५. दाव्यातील मिळकत ही वादी यांना अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्क मान्य करणे) नियम, २००८ अन्वये दि. १९.०६.२०१० रोजी समितीने अ.क्र. २० आय.डी.नं.६०७९ ने खासरा/खंड क्र. ३२१ मधील ०३–२५ आर इतके क्षेत्र वादींना कायदेशिर मालकी हक्काने मंजूर केलेला आहे.

६. अशी एकूण परिस्थिती असताना दि. २०.०६.२०२२ रोजी सर्व प्रतिवादी हे दावा मिळकतीत संगनमताने बेकायदेशिरपणे घुसून वाद उपस्थित करुन वादीच्या कब्जेउपभोगास हरकत अडथळा निर्माण करु लागले. तसेच प्रतिवादींनी वादींना बेकब्जा करण्याची देखील धमकी दिली होती. तसेच दि. ३१.०७.२०२२ रोजी प्रतिवादींनी पुन्हा दावा मिळकतीत दक्षिणेकडून घुसले. तसेच प्रतिवादी हे वादीला धमकी देवू लागले की, दावा मिळकत परत नाही केली तर त्यांचे हातपाय तोडतील. दावा मिळकतीशी प्रतिवादींचा कुठलाही संबंध नसून प्रतिवादी हे बेकायदेशिरपणे दावा मिळकतीवर त्यांचे नांव लावून घेण्याचे प्रयत्न करतील.

७. अशा परिस्थितीत जर प्रतिवादींनी वादीच्या कब्जेस हरकत अडथळा केला तर वादीचे पैशांत मोजता न येणारे नुकसान होईल. म्हणून प्रतिवादींनी स्वतः अगर इतर कोणाही मार्फत कोणताही हरकत अडथळा करु नये अथवा करवू नये, असा तुर्तातूर्त मनाई हुकूमाचा आदेश होणेस विनंती केलेली आहे.

८. सदरील दाव्यात प्रतिवादी हजर होवून निशाणी क्र. १४ वर कैफियत दाखल केलेली आहे. प्रतिवादींचे म्हणणे आहे की, वादीने सदरचा दावा हा प्रतिवादीने दाखल केलेला नियमित दिवाणी दावा क्र. २४/२०२२ ला शह देण्यासाठी दाखल केलेला आहे. दावा मिळकत ही वादीच्या ताब्यात नसून त्यावर वादीचा मालकी हक्क नाही. दाव्यात दाखल केलेले कागदपत्रे ही दुसऱ्या जमिनीची कागदपत्रे असून त्यांचा दावा मिळकतीशी संबंध नाही. दावा मिळकत ही सुमारे सन १९८० पूर्वीपासून प्रतिवादीने सापसफाई करुन त्यावर खेडमशागत करुन त्यांचा कुटूंबाचा उदरनिर्वाह करीत आहेत. दावा मिळकतीतील सर्व झाडे ही प्रतिवादींनीच लावलेली आहेत. दि. १०.०६.२०२२ रोजी प्रतिवादी क्र. १ व ४ हे दावा मिळकतीतील खेडमशागत करीत असताना वादी क्र.१ ने प्रतिवादींच्या कब्जेउपभोगास हरकत अडथळा केला होता. तसेच वादी हे प्रतिवादींना धमकी देत होते की, ते प्रतिवादींना सदरील जमीन खेडू देणार नाहीत, प्रतिवादींना दावा मिळकतीत पाय ठेवायचा नाही अन्यथा त्यांचे पाय तोडण्यात येतील. म्हणून प्रतिवादी क्र. १ ने वादी क्र. १ विरुध्द तक्रार केलेली आहे. म्हणून वादीला हरकत अडथळा करण्याचा व बेकब्जा करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. वादींनी नमुद केलेल्या दिवशी कुठलीही तथाकथित घटना घडलेली नाही.

९. याउलट, सत्य परिस्थिती अशी आहे की, वादींची मौजे कांज्यापानी येथे खासरा क्र. ३२१ मध्ये अतिक्रमित जमीन असून तिच्या चतुर्सिमा खालीलप्रमाणे आहेत.

पुर्वेस– वान्या बारक्या वळवीची शेतजमीन व त्यात बांधीव घर,
पश्चिमेस– फॉरेस्ट वन जमीन व डोंगर,
उत्तरेस– हुताऱ्या सामा वसावेची अतिक्रमित शेतजमीन व
दक्षिणेस – वान्या बारक्या वळवीची अतिक्रमित शेतजमीन.

१०. सदरील शेतजमीन ही वादींना जिल्हास्तरीय समिती, नंदुरबारने दिलेली आहे. दाव्यातील शेतजमिनीत प्रतिवादी क्र. १ ते ४ यांची अतिक्रमित जमीन सुमारे ०१.०० आर ही स्थानिक समितीने मोजणी करुन प्रतिवादींच्या ताब्यात व मालकी हक्काने दिलेली आहे. उर्वरित शेतजमीन नंतर मोजणी करुन देण्याबाबत स्थानिक वन समितीने प्रतिवादी क्र. १ ते ४ यांना सांगितले आहे. सदरील वन जमिनीत अतिक्रमण केल्याबाबत प्रतिवादी क्र. १ विरुध्द वन विभागाने फौजदारी केस देखील केलेली आहे.

११. सबब वादींनी प्रतिवादींविरुध्द सदरहु खोटा व दिखावू स्वरुपाचा दावा दाखल केलेला आहे. न्यायाचा झुकता तराजु प्रतिवादींच्या बाजूने असून सदरील अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचे कधीही न भरुन येणारे व रुपयात न मोजता येणारे नुकसान होईल. सदरील दावा प्रथमदर्शनी प्रतिवादीच्या बाजूने आहे. म्हणून सदरील अर्ज नामंजूर करण्यात यावा.

१२. वादी व प्रतिवादी हजर. वादींचे वकील हजर. प्रतिवादींचे वकील गैरहजर. वादी पक्षाचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादींचे वकील गैरहजर असल्याने व त्यांचा कुठलाही अर्ज नसल्याने सदरील अर्ज हा त्यांच्या युक्तिवादाविना चालविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने खालील मुद्दे माझ्या विचाराधीन असुन त्यांचे निष्कर्ष कारणमीमांसेसह मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादीने त्यांच्या बाजुने सकृतदर्शनी केस आहे हे शाबीत केले काय? | होकारार्थी. |
| २ | न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने आहे काय? | होकारार्थी. |
| ३ | तुर्तातुर्त मनाई हुकूम न दिल्यास वादीचे अतोनात नुकसान होईल काय? | होकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| ४ | आदेश काय? | अर्ज मंजुर केला. |

## का र ण मि मां सा

### मुददा क्र. १ ते ३ करिताः–

१३. सदरील दावा हा निरंतर मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. वादींच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. पटलावर दाखल असलेले दस्तऐवज पाहिले.

१४. वादीने दावा प्रथमदर्शनी त्यांच्या बाजूने आहे हे दर्शविण्यासाठी दाव्यात दावा मिळकतीचा वनपट्टा दाखल केलेला आहे. सदरील वनपट्टा पाहिला असता त्यात प्रथमदर्शनी खासरा ३२१, क्षेत्र ०३–२५ आर हे वादीच्या नावाने वन हक्कधारक म्हणून दिसत आहे. याउलट, प्रतिवादींच्या म्हणण्यानूसार दावा मिळकतीवर त्यांचा मालकी हक्क व ताबा असल्याबाबत कुठलाही प्रथमदर्शनी कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. फक्त प्रतिवादींच्या कैफियतीवर विसंबून राहून सदरील दावा हा प्रथमदर्शनी प्रतिवादींच्या बाजूने आहे असे म्हणता येणार नाही. याउलट, वादींनी त्यांच्या वादपत्रातील कथनाच्या पृष्टयर्थ ताब्यात असलेल्या वन जमिनीचा मालकी हक्क जोडपत्र दाखल केलेले आहे. म्हणून वादीच्या कथनास दुजोरा मिळत आहे.

१५. अशा परिस्थितीत दाव्यातील कागदपत्रे प्रथमदर्शनी वादीच्या बाजूने असल्याचे दिसत आहे. दावा मिळकत वादींचे कब्जेत असल्याने जर भविष्यात प्रतिवादींनी वादींना हरकत अडथळा केला तर त्यांचे पैशात मोजता न येणारे नुकसान होणार आहे. याउलट, तुर्तातूर्त मनाई हुकूमाचा आदेश वादींच्या बाजूने दिला तर प्रतिवादी यांना कुठलेही नुकसान होईल अशी कुठलीही परिस्थिती दिसत नाही अथवा प्रतिवादींनी पटलावर आणलेली नाही.

१६. तुर्तातूर्त मनाई हुकूम हा एक न्यायाच्या तौलनिक तत्त्वावर विसंबून असणारा पर्याय आहे. वरील सर्व बाबींचा विचार केला असता दावा हा प्रथमदर्शनी वादींच्या बाजूने असून, तुर्तातूर्त मनाई हुकूमाचा आदेश वादीच्या बाजूने दिला नाही तर त्यास पैशात मोजता न येणारे नुकसान होण्याची दाट शक्यता आहे. तसेच तुर्तातूर्त मनाई हुकूमाच्या आदेशाचा मुख्य उद्देश हा दावा मिळकत ही दाव्याचा निकाल लागेपर्यंत सुरक्षित ठेवणे असतो. म्हणून वरील सर्व विवेचनाच्या निष्कषार्थ वादी हे तुर्तातूर्त मनाई हुकूम मिळणेस पात्र आहेत. म्हणून मुद्दा क्र. १ ते ३ यांचे उत्तर अंशतः होकारार्थी नोंदवित आहे. सबब खालील प्रमाणे आदेश पारित करत आहेः

**मुददा क्र. ४ करिता –**

१७. वरील मुद्दा क्र. १ ते ३ चे निष्कर्ष अंशतः होकारार्थी नोंदविण्यात आलेले आहे. सबब खालील प्रमाणे आदेश पारित करत आहे.

| **अ.क्र.** | **आ दे श** |
|---|---|
| १ | निशाणी क्र. ५ वरील अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे. |
| २ | प्रतिवादींनी अथवा प्रतिवादींतर्फे इतर कोणीही दाव्याचा निकाल लागेपर्यंत वादींच्या दावा मिळकतीतील खासरा ३२१, क्षेत्र ०३–२५ आर, चतुर्सिमा पुर्व– काशा हुन्या ठाकरेचे शेत, पश्चिम– शिलदार फाडया पावरा यांचे शेत, दक्षिण – बाहदऱ्या काल्या पावरा यांचे शेत व उत्तर – मोठा नाला व घाट वरील कब्जे उपभोगास हरकत अडथळा करु नये अथवा करवू नये, असा तात्पुरता मनाई हुकूमाचा आदेश देण्यात येत आहे. |

Digitally signed by Dipak Gokul Kankhare
Date: 2023.04.18 17:02:29 +0530

दिनांक १८.०४.२०२३ **(दिपक गो. कंखरे)**
ठिकाणः धडगांव दिवाणी न्यायाधीश क. स्तर, धडगांव.

## <u>दा ख ला</u>

दाखला देण्यात येतो की, सदर पी.डी. एफ. फाईलमधील मजकुर हा मुळ आदेश/ न्यायनिर्णयाप्रमाणेच आहे..

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | – | राजेश रं. निकम, लघुलेखक श्रेणी–३, |
| न्यायालयाचे नांव | – | दिवाणी व फौजदारी न्यायालय, धडगांव, जि. नंदुरबार. |
| आदेश/न्यायानिर्णय जाहीर केल्याचा दिनांक | – | १८.०४.२०२३ |
| मा. पिठासिन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याचा दिनांक | – | १८.०४.२०२३ |
| आदेश/न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दिनांक | – | १८.०४.२०२३ |